MSMC

RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

# महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादीत

( महाराष्ट्र शासन उपक्रम )

" खनिकर्म भवन"प्लॉट नं.७,अजनी चौक,वर्धा रोड,नागपूर ४४००१५

---

दुरध्वनी : ०७१२ २२५३२०४ ते ०६
ई मेल : info@msmc.gov.in

फॅक्स कमांक - ०७१२ २२५३२०३
www.msmc.gov.in

---

पत्र कं.मराखम/आस्था/२०२०/ 678

दिनांक : 14 AUG 2020 / ०८ /२०२०

**सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचा-यांची कंत्राटी पध्दतीवर नेमूणक करण्याबाबत.**

सामान्य प्रशासन विभागाच्या, शासन निर्णय कमांक संकिर्ण-२७१५/प्र.क.१००/१३,दिनांक १७ डिसेंबर २०१६ अनुसार खनिकर्म विभाग, मंत्रालय,मुंबई येथे " Mining Consultant " कामाकरीता कंत्राटी पध्दतीने १ ( एक ) गट - अ संवर्गातील पात्र सेवानिवृत्त अधिका-यांची थेट मुलाखतीद्वारे नेमणूक करावयाची असल्याने पात्र सेवानिवृत्त अधिका-यांनी आपले अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये उपरोक्त पत्त्यावर या जाहिरातीच्या दिनांकापासून ८ दिवसाच्या आत सादर करावेत.सदर कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

**अटी व शर्थी**

- करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिका-यांचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
- करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्तीचा कालावधी १ वर्षाची कालमर्यादा असेल. अशा नियुक्तिचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करता येईल.मात्र एकूण कालावधीत तिन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
- करार पध्दतीने घेण्यात येणा-या अधिका-यास सबंधीत खनिकर्म विषयाशी कामाचा मंत्रालयीन स्तरावरील गट - अ पदाचा ३ वर्षाचा अनुभव असावा.( अवर सचिव व उपसचिव मिळून )
- करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
- सेवानिवृत्त अधिका-यांची करार ( Contractual ) पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ति ही नियमित स्वरूपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात येईल.

- करार पध्दतीने नियुक्ती देण्यास आल्यामुळे सबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबात/सामावून घेण्याबाबत वा नियमित शासनाचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
- नियुक्तिच्या कालावधीत करार पध्दतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी सबंधीत व्यक्तिची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.
- सेवानिवृत्त अधिका-यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नमेणूक करतांना त्यांना सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून ( मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन ) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन ( महागाई भत्ता व अशं राशीकृत निवृत्ती वेतनासह ) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

**व्यवस्थापकीय संचालक**
महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्या.,नागपूर

# अर्जाचा नमुना

उमेदवाराने अलिकडील
काळातील स्वतःचे छायाचित्र
येथे चिकटवावे

१) अर्ज केलेल्या पदांचे नाव :- ----------------------------------------------------------------------------------------

२) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- ----------------------------------------------------------------------------------------

३) अर्जदाराचा पत्ता :- ----------------------------------------------------------------------------------------

४) भ्रमणध्वनी क्रमांक :- ----------------------------------------------------------------------------------------

५) जन्म दिनांक व वय :- ----------------------------------------------------------------------------------------

६) शिक्षण :- ----------------------------------------------------------------------------------------

७) सेवेचा तपशील :- ----------------------------------------------------------------------------------------

८) अनुभव :- ----------------------------------------------------------------------------------------

उपरोंक्त पदावर कंत्राटी पद्धतीने नियुक्तीबाबत जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी